का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेचे मुखपत्र
ISSN 0971-6955

# आमची श्रीवाणी

संयुक्त अंक
वर्ष २७ : अंक २ - फेब्रु.२०२० ते मे २०२०
अंक ३ - जून २०२० ते सप्टेंबर २०२०

# समकालीन मराठी साहित्य : प्रेरणा आणि प्रवृत्ती
## (विशेषांक - भाग २)

(या अंकासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अनुदान मिळाले आहे.)

'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.'

Scanned with OKEN Scanner

- **प्रमुख संपादक**
  वंदना महाजन

- **संपादक मंडळ**
  प्रल्हाद लुलेकर
  संजयकुमार करंदीकर
  महेंद्र कदम
  पृथ्वीराज तौर

- **सल्लागार**
  नागनाथ कोत्तापल्ले
  यशवंत मनोहर
  प्रभाकर मांडे
  मनोहर जाधव
  शोभा शिंदे

- **संपादकीय व व्यवस्थापकीय संपर्क**
  का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था
  उन्नतिनगर, देवपूर, धुळे - ४२४ ००२.
  दूरध्वनी : २२३६५४, २२२७६२.

- **मुद्रक व प्रकाशक**
  प्रा. डॉ. वंदना महाजन
  संचालक
  का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था,
  उन्नतिनगर, देवपूर, धुळे - ४२४ ००२

- वार्षिक वर्गणी : ३०० रु.(३ अंक) • द्वैवार्षिक वर्गणी : ५०० रु. (६ अंक)
- या अंकाची किंमत रु.३००/-



या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या साहित्यातील मतांशी 'आमची श्रीवाणी'चे संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.


Scanned with OKEN Scanner

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| * | संपादकीय | पृ.क्र. |
| १) | मी आणि माझा प्रवताल<br>- प्रज्ञा पवार | १ |
| २) | मराठी कवितेचा समकाल : नव्वदोत्तर की समाजमाध्यमोत्तर ?<br>- सुदाम राठोड | ९ |
| ३) | समकालीन मराठी कविता<br>- रमाकांत कराड, संभाजी शिंदे | १४ |
| ४) | मराठी कविता : काही निरीक्षणे<br>- रमेश माने | २४ |
| ५) | समकालीन निवडक मुस्लिम कवींची कविता<br>- युवराज भामरे | ३४ |
| ६) | समकालीन सामाजिक वास्तव आणि मराठी कविता<br>- भूषण रामटेके | ४० |
| ७) | समकालीन मराठी कविता आणि जागतिकीकरण<br>- जितेंद्र गिरासे | ४३ |
| ८) | स्त्रियांची समकालीन कविता<br>- सरिता सोमाणी | ४७ |
| ९) | स्त्रीवादी कवितेतील संविधानकेंद्री विचारसूत्रे<br>- सत्यजित साळवे | ५५ |
| १०) | समकालीन मराठी कवितेतील बदलते ग्रामवास्तव<br>- कैलास सलादे | ६१ |
| ११) | २१ व्या शतकात ग्रामीण शिवार बोलकं करणारी कल्पना दुधाळ यांची कविता<br>- नानासाहेब पवार | ६६ |
| १२) | यशवंत मनोहरांच्या 'प्रतीक्षायन' मधील भावविश्व<br>- नामदेव गावीत | ७१ |
| १३) | समकालीन मराठी कविता<br>- रेखा इंगोले | ७४ |
| १४) | आंबेडकरी मनातील कल्लोळाची कविता<br>- शत्रुघ्न जाधव | ७८ |
| १५) | 'भूईभोग'ग्रामीण कवितेतील समकालीन जाणीव<br>- सोमनाथ पावडे | ८१ |
| १६) | शहर आत्महत्या करायचं म्हणतंय...!<br>- हिरा वाघ | ८५ |
| १७) | निळ्या डोळ्यांची मुलगी : स्त्री जाणिवांचा समकालीन भेदक आविष्कार<br>- योगिता पाटील | ८८ |
| १८) | समकालीन नव्वदोत्तरी मराठी कथा<br>- कैलास कळकटे | ९२ |


Scanned with OKEN Scanner

# समकालीन मराठी कविता

- रमाकांत कराड, संभाजी शिंदे

**प्रास्ताविक :**

मराठी साहित्यव्यवहारामध्ये १९६० नंतरच्या कालखंडामध्ये खऱ्या अर्थाने साहित्याचे क्षितिज विस्तारीत होत असल्याचे दिसून येते. परिणामी याच कालखंडामध्ये मराठी साहित्यामध्ये वेगवेगळे प्रवाह निर्माण झाले. यामध्ये कथा, कादंबरी, कविता, नाटकं, चरित्र आणि आत्मचरित्र यासारख्या वाङ्मयप्रकाराचा उल्लेख करता येईल. या सर्वच वाङ्मयप्रकारांच्या माध्यमातून तत्कालीन समाज प्रकर्षाने प्रतिबिंबित होताना दिसतो. प्रत्येक साहित्य प्रकाराची बलस्थाने ही वेगवेगळी असतात. समाजव्यवहारामध्ये साहित्य आणि मानव यांचे नाते अतुट आहे. त्यातही 'कविता' हा वाङ्मयप्रकार सर्वांच्याच परिचयाचा आणि जिव्हाळ्याचा असल्याने 'कविता' वाचली नाही असा व्यक्ती समाजामध्ये विरळाच. प्रत्येकाने आयुष्यामध्ये कधीतरी कवितांचे वाचन हे केले असणारच. कविता हा वाड्.मयप्रकार जरी आकाराने लहान असला तरी आशयाच्या दृष्टिकोणातून मात्र तो विस्तृत अशाप्रकारचा वाड्.मयप्रकार आहे. तो आकाराने छोटा मात्र आशयाने मोठा असल्याने मानवी जीवन सर्वांगपरिपूर्णरित्या नेमकेपणाने अभिव्यक्त करू शकतो. परिणामी समाजामध्ये सर्वात जास्त लोकांना मनापासून आवडणारा वाङ्मयप्रकार म्हणून कवितेचा अग्रक्रमाने उल्लेख होतो. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये समकालीन कवितेचे स्वरूप आणि आधुनिक कालखंडातील समकालीन कवितेचे बदलते रूप विवेचित करण्याचा प्रयत्न केला आहे.

**समकालीन : संकल्पना व स्वरूप**

मानव हा समाजशील प्राणी आहे. समाजाशिवाय तो जिवंत राहू शकत नाही. वास्तविक पाहता साहित्य हे मानवाच्या समाजव्यवहाराचे एक अंग आहे. त्यामुळे स्वाभाविकपणेच मानव हा साहित्याच्या केंद्रस्थानी असणे अपरिहार्य आहे. म्हणूनच माणूस, त्याचे जीवन आणि जगणे, त्यांचे जग आणि सभोवतालचे पर्यावरण हे साहित्याचे प्रधान विषय ठरतात. लेखकाचे सभोवतालच्या सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाशी जैविक नाते असते. त्यामुळे पर्यावरणातील परिवर्तनाचे पडसाद त्याच्या आविष्कृतीमधून उमटत असतात. त्याचबरोबर लेखक ज्या समाजात जन्माला येतो त्या समाजाची एक संस्कृती, परंपरा असते. त्या समाजाची एक संस्कृती, परंपरा असते. त्या समाजातील रूढी, आचारविचार, संकेत, शिष्टाचार, धर्मकल्पनांचे दर्शन लेखक आपल्या साहित्यातून घडवत असतो. थोडक्यात लेखकाची एकंदर विचारसरणी समाजाशी निगडित असते. समाज हा नेहमी गतीशील असतो. जडत्व हे समाजामध्ये कदापिही नसते. परिवर्तन हा समाजाचा स्थायीभाव असतो. या परिणामातून वेगवेगळ्या जाणिवा, प्रवाह साकार होत जाताना दिसतात. त्या गतीशीलतेची एक अपरिहार्य परिणिती म्हणजे समकालीन होय.

साहित्यव्यवहारामध्ये प्रामुख्याने अनेक संकल्पना रूढ झालेल्या आहेत. जसे की देशीयवादी, अस्तित्ववादी, वास्तववादी, जनवादी, मार्क्सवादी इ. संकल्पना महत्त्वाच्या मानलेल्या आहेत. एखादी संकल्पना सहजासहजी निर्माण होत नाही. त्यापाठीमागे काही महत्त्वाच्या घटना, विचार, संकल्पना मुळातच महत्त्वाच्या मानलेल्या आहेत. मराठी साहित्याच्या इतिहासामध्ये प्रामुख्याने 'प्राचीन साहित्य', 'अर्वाचीन साहित्य' आणि 'आधुनिक साहित्य' अशाप्रकारच्या संज्ञा मानल्या जातात. यामध्ये प्राचीन साहित्य



Scanned with OKEN Scanner

म्हणजे महानुभाव पंथ, ज्ञानेश्वरांपासून ते तुकाराम, रामदासांपर्यंतच्या संतांचे साहित्य, मुक्तेश्वरांपासून ते मोरोपंतांपर्यंतच्या पंडित कवींचे साहित्य आणि रामजोशीपासून प्रभाकर, होनाजी बाळापर्यंतचे शाहिरांचे साहित्य इत्यादी साहित्यपरंपरेचा समावेश होतो. यापैकी अठराव्या शतकातल्या साहित्याला 'समकालीन प्राचीन साहित्य' असे संबोधले जाते. १९४५ च्या आसपास जी साहित्यनिर्मिती झाली, त्या साहित्यनिर्मितीतून काही संकल्पना व वाङ्मयीन प्रवाह वाङ्मयाच्या प्रांतात रूढ झाले. त्यापैकी समकालीन साहित्य, नवसाहित्य, स्वातंत्र्योत्तर साहित्य, साठोत्तर साहित्य, जनवादी साहित्य, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदी संकल्पना आणि वाङ्मयीन प्रवाहांचा यामध्ये अंतर्भाव करता येईल. यापैकी 'समकालीन' या संकल्पनेचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. समकालीन म्हणजे काय? याचे उत्तर देणे जरी अवघड असले तरी 'समकालीन' या संकल्पनेतून काळाचा निर्देश होतो. यामाध्यमातून 'समकालीन' या संकल्पनेचा व्यापक अर्थ नजरेत भरतो.

'वास्तविक पाहता आपल्या आसपासच्या बदलत्या कालखंडातील व्यक्ती, घटना, प्रसंग, जीवन-जाणिवा, विचारप्रणाली, भावानुभूती यांचे चित्रण, युगभान सांभाळून ज्या साहित्यात केले जाते ते साहित्य समकालीन साहित्य ठरते'. अशाप्रकारचे साहित्य हे समकालीन वाचकांचे सांस्कृतिक आणि सामाजिक-वाङ्मयीन (Cultural and socio -literal)) असे आत्मचरित्रच असते. मानवी सुख, दुःख हे सनातनी असले तरी वर्तमान युगामधील सुख, दुःख हे पूर्वीच्या समाजापेक्षा वेगळे आहे. पूर्वीच्या साहित्यातील मानवी जीवनसमस्या या कदाचित वर्तमान समाजाला आपल्या वाटणार नाहीत. परिणामी त्यांचे आत्मभान जागृत होणार नाही असे मात्र नाही. सर्वच साहित्य वाचले जाते असे नाही मात्र समकालीन साहित्य हे आपल्या कालखंडातील साहित्य म्हणून उत्सुकतेपोटी का होईना वाचले जाते. माणूस म्हणून जगताना समाज, संस्कृती, भाषा यांच्या माध्यमातून काही साहित्य आपल्यापर्यंत येऊन पोहचते. अशावेळी ते वाचनीय होतच असते. कारण, आपले भावानुभव आणि सुखदुःख त्या माध्यमातून साकार झालेले असतात. परिणामी अशाप्रकारचे साहित्य हे मर्यादित अर्थाने का होईना समकालीन साहित्य ठरते. समकालीन साहित्याच्या ज्वलंततेसंदर्भात मदन कुलकर्णी यांनी त्यांच्या 'समकालीन साहित्य' या लेखामध्ये पुढील विवेचन केले आहे, ''समकालीन साहित्य हे उत्सुकतेपोटी वाचले जाते. अशा वाचकांची संख्याही मर्यादित असते. साहित्याच्या विशाल वर्तुळातील एका अंतरवर्तुळातील हे साहित्य असते आणि हे साहित्य समजून घेण्यासाठी विशिष्ट अभिरुची असलेला वाचकवर्गही त्या आंतरवर्तुळातीलच असतो. बाकी बहुतांश वाचकवर्ग हा समकालीन साहित्याबरोबर निर्माण होणाऱ्या रंजनपर साहित्याचा वाचकवर्ग होऊ शकते, तसेच वाचन, आस्वादन आणि चिंतन याद्वारे ही वाङ्मयाभिरुची प्रगल्भ होऊ शकते. समकालीन साहित्याच्या अध्ययन, आकलन व आस्वादाची प्रगती ही त्या साहित्याच्या अभिरुचीच्या जिवंतपणाची खूण असते.''[१] या माध्यमातून समकालीन साहित्याची वाचकप्रियता नेमकेपणाने आपणास ज्ञात होते. त्यामुळेच प्रस्तुत शोधनिबंधामध्ये समकालीन ही संकल्पना आणि या समकालीनतेच्या प्रभावातून निर्माण झालेली कविता व तिचे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. 'समकालीन' या संकल्पनेच्या व्याख्या असंख्य अभ्यासकांनी केलेल्या आहेत यापैकी काही मोजक्याच व्याख्यांचा आपण आढावा घेणार आहोत.

**१. मदन कुलकर्णी** : ''आपल्या आणि आपल्या आसपासच्या बदलत्या कालखंडातील व्यक्ती, घटना, प्रसंग, जीवन-जाणिवा, विचारप्रणाली, भावानुभूती यांचे चित्रण युगभान सांभाळून ज्या साहित्यात केलेले



Scanned with OKEN Scanner

असेल ते साहित्य समकालीन साहित्य ठरेल.''[१]

२. ''समकालीन साहित्य म्हणजे जे साहित्य आपल्या काळाबरोबर आहे. ज्या काळात ते निर्माण होत असते, त्या काळाचे प्रतिबिंब त्यात आहे. त्या काळातील विचार, जाणिवा, मते ज्या साहित्यातून व्यक्त होतात ते साहित्य.''[३]

हे साहित्य आपल्या काळाशी आणि त्या काळातील परिस्थितीशी जवळचे नाते सांगते. या काळात घडलेल्या घटनांचे पडसाद संबंधित साहित्यातून उमटतात. ह्या काळातील मानवाच्या इच्छा-आकांक्षा, प्रयत्न, असहायता, पराभव, वेदना, विद्रोह, स्वप्ने, इत्यादींचा प्रामाणिक आविष्कार साहित्यातून होतो. त्यामुळे त्याला 'समकालीन साहित्य' म्हटले जाते. मराठीतील १९४५ ते १९६० आणि १९६० आणि १९८५ ह्या कालखंडातील साहित्याला समकालीन साहित्य असे संबोधले जाते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये साधारणत: २००० नंतर लिहिल्या गेलेल्या समकालीन कवितांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**आधुनिक कालखंडातील समकालीन कविता**

भारतीय स्वातंत्र्याची प्राप्ती ही भारतीयांच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाची घटना आहे. दीडशे वर्षांची ब्रिटिशांची गुलामगिरी संपून भारत राजकीयदृष्टीने एक स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशात झळकू लागला. त्याची स्वत:ची राज्यघटना अस्तित्वात आली. स्वत:ची अशी राजकीय आणि आर्थिक प्रणाली अस्तित्वात आली. भारताने प्रतिनिधीक लोकशाही शासनाचा स्वीकार केल्यामुळे जनतेचे प्रतिनिधी शासनात सहभागी झाले. शहरी तसेच ग्रामीण भागालाही प्रतिनिधीत्व मिळाल्यामुळे दोन्ही भागांतल्या जनतेला राजकीय भान येऊ लागले. लोकशाही राज्यव्यवस्था, समाजवादी समाजरचना, प्रातिनिधीक शासन, पंचवार्षिक योजना, सार्वत्रिक शिक्षण प्रसाराला दिलेले महत्त्व, भाषावार प्रांतरचनेला दिलेली मान्यता व त्यामुळे प्रादेशिक भाषांना लाभलेले स्वत:चे अस्तित्व, इत्यादी गोष्टींचा हळूहळू साहित्याच्या जगावरही प्रभाव पडू लागला. स्वातंत्र्याबरोबरच फाळणीने उसळलेल्या जातिधर्मद्वेषाचा डोंबही भारतीयांच्या मनावर परिणाम करणारा ठरला. औद्योगिक क्रांती, महानगराचा जन्म याही गोष्टी याच काळात आहेत.

दुसरे जागतिक युद्ध आणि भारताचे स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टी १९४५ च्या आसपासच्या असल्यामुळे १९४५ पासून नव्या कालखंडाची सुरुवात मानावी हे स्वाभाविकच आहे. तसेच या वर्षाच्या आसपासच्या नव्या जाणिवा व्यक्त करणारे लेखन प्रकाशित होऊ लागले. इतर भारतीय भाषांमधूनही याच सुमारास 'नवे' लेखन प्रसिद्ध होऊ लागले. त्यामुळे मराठीतच नव्हे; तर बहुतेक सर्वच भारतीय भाषांमध्ये १९४५ ते १९६० आणि १९६० ते १९८५ आणि साधारणत: २००० नंतरच्या कालखंडात उदयास आलेले आधुनिक समकालीन साहित्य अशाप्रकारचे स्थूल कालखंड कल्पिले आहेत. १८५० पासून राष्ट्रवादी जाणिवा -पुरोगामी जाणिवेबरोबरच प्रयोगशीलतेचाही आविष्कार दिसून येतो. समकालीन जीवनातील विविध समस्या, प्रश्न, कालविषयक भान, युद्धोत्तर स्थिती यांबरोबरच साहित्यविषयक नव्या विचारांचाही प्रभाव भारतीय साहित्यावर पडलेला दिसतो.[४] प्राचीन, अर्वाचीन, समकालीन हे तीनही शब्द काळाचा निर्देश करणारे, तर आधुनिक हा दृष्टिकोनाचा निर्देश करणारा शब्द आहे.

आधुनिक आणि समकालीन यातला मुख्य भेद म्हणजे आधुनिक साहित्य हे समकालीन साहित्य असू शकते, परंतु समकालीन साहित्य हे आधुनिक साहित्य असेलच असे नाही. समकालीनतेमध्ये त्या विशिष्ट काळातील समस्या, प्रश्न, ताण, अंतर्विरोध यांचा समावेश होतो. म्हणजे समकालीनतेमध्ये तात्कालीनतेचा संदर्भ असतो. मनुष्याला तात्कालिक



Scanned with OKEN Scanner

संदर्भ महत्त्वाचे वाटतात. तसेच काही तात्कालिकतेच्या सीमेबाहेरचे व्यापक संदर्भ महत्त्वाचे वाटतात. काही शाश्वत प्रश्न, सनातन समस्या असतात. मानवाची स्थिती, मानवाची नियती यांविषयीचे ते प्रश्न असतात. समकालीन समस्येची सोडवणूक करीत असतानाच त्या शाश्वत समस्येचीही सोडवणूक करण्याचा तो प्रयत्न असतो. त्यामुळे समकालीन लेखनातही 'आधुनिकता' आढळते.

साधारणत: १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले ही भारतीयांच्या जीवनातील अतिशय महत्त्वपूर्ण घटना आहे. परंतु स्वातंत्र्याचा वाङ्मयीन प्रांतावर फारसा प्रभाव पडल्याचे दिसत नाही. अशाप्रकारची भूमिका म. द. हातकणंगलेकर यांनी 'प्रदक्षिणा खंड दुसरा' या ग्रंथामध्ये मांडली आहे ती पुढीलप्रमाणे, ''स्वातंत्र्योत्तर काळात मर्ढेकरांच्या कवितेने नवा मानदंड निर्माण केला आणि त्या अनुरोधाने नवतेचा वेध घेतला जावू लागला. कथेमध्ये हेच कार्य गंगाधर गाडगीळ यांच्या कथेने केले. नव्या लेखनाबरोबर नव्या अभिरूचीचे बीजारोपण झाले मात्र कादंबरीतून असे काही बंडाचे निशाण घेवून तिचे संपूर्ण रूपच बदलण्यासाठी हेतुत: कोणी पुढे सरसावलेच असे घडले नाही.''[४] म. द. हातकणंगलेकर यांचे हे मत विचारात घेता एक बाब प्रकर्षाने लक्षात येते ती म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची पहिली पाच-सहा वर्षे म्हणजेच १९४५ ते १९६० या कालखंडावर स्वत:च्या काव्यलेखनानी स्वत:ची नाममुद्रा गडद करणारे बा. सी. मर्ढेकर हे अतिशय महत्त्वाचे कवी. 'शिशिरागम' नावाचा त्यांचा कवितासंग्रह १९३१ साली प्रसिद्ध झाला. या संग्रहातील कवितेवर बालकवींचा व माधव ज्यूलियन यांच्या कवितेचा प्रभाव काही प्रमाणात जाणवत असला तरीही पुढे मर्ढेकरांनी संपूर्ण नवकविता लिहिली. १९४७ साली त्यांचा 'काही कविता' आणि १९५१ साली 'आणखी काही कविता' हे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. या संग्रहातील कवितेने कवितेच्या घाटात क्रांतिकारक बदल घडवून आणला. त्यांच्या कवितेतून समकालीन वास्तवाचे प्रत्ययकारी चित्र रेखाटले गेलेले दिसून येते.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये २०१० नंतरच्या समकालीन कवितांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. मराठी कवितेला आशयाविभव्यक्तीची नवशैली देणारे आणि मराठी कवितेच्या प्रांतात स्वतंत्र काव्यवाट निर्माण करणारे विचारवंत, कवी म्हणून यशवंत मनोहरांचा उल्लेख करता येईल. दलित साहित्याला आंबेडकरी विचारसौंदर्याची ऊर्जा प्रदान करून देणारे विचारवंत, लेखक, समीक्षक म्हणूनही त्यांचा उल्लेख केला जातो. मानवी जगातील विषमतेचे निर्मूलन करून तळागाळातल्या सर्वहारा शोषित-दलित-पीडितांना, स्वातंत्र्य-समता-बंधुतेचा मूलमंत्र देणारे आणि मानवमुक्तीचा दीर्घकाळ लढा लढणारे संविधानकर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानुषतावादी तत्त्वज्ञानावर कवीची निस्सीम डोळस श्रद्धा आहे. मानवमुक्तीचा लढा आणि मानुषतेच्या तत्त्वज्ञानाची कालनिहाय चिकित्सा आणि श्रद्धांची तपासणी करण्याचा प्रयत्नही यशवंत मनोहरांनी आजवरच्या साहित्यनिर्मितीतून केल्याचे दिसून येते. यशवंत मनोहरांची कविता इतिहास, धर्म, जातिव्यवस्था, वर्ण-वर्गव्यवस्था, शोषणाचे आदिबंध आर्दीविरुद्ध बुद्धिवाद - बौद्धवाद - आंबेडकरवाद-मानवतावाद यांच्या परिप्रेक्ष्यातच जागतिक स्तरावर शोषितांच्या बाजूने त्यांची कविता लढत आल्याचे दिसून येते. कवी यशवंत मनोहरांच्या युगांतर (२०१५), युगमुद्रा (२०१६), बाबासाहेब..! (२०१६) या तिन्ही कवितासंग्रहातून विश्वमातृत्वाचा एक आदिबंध उद्धृत झाल्याचे दिसते. युगांतर ते युगमुद्रा या तिन्ही संग्रहातील काव्यधारेतून मानव्य आणि कारुण्याचा एक विश्ववादी मानवी युगाचा लोकायत चेहरा उजागर झाला आहे. याबरोबरच परिशिष्टात - भीमा, अजिंक्य संगर, नव्या

युगाचे युद्धगीत; तर ज्या रमाईने भीमायन रचले त्या विश्वमातृत्वाचा गौरव करणाऱ्या - तू दिसतेस मला, माता रमाई, करुणेची कविता, दु:ख नेसलीस तरी, तू आमुची आई, तू अखंड जळती वात ह्या कवितांचाही या संग्रहात समावेश केलेला आहे. ह्या एकूणच कवितांतून, बाबासाहेबांच्या प्रज्ञावंत, प्रज्ञाशील, समता - स्वातंत्र्याचा स्वयंभू तत्वोद्गार व्यक्त झाला आहे. थोडक्यात सूर्यकुलीन महामानवाच्या सर्वंकष चिकित्सेतून जन्माला आलेली मानुषताच त्यांनी अधोरेखित केली आहे.

समाजव्यवहारामध्ये साहित्य आणि मानव यांचे नाते अतुट आहे. त्यातही 'कादंबरी' हा वाङ्मयप्रकार सर्वांच्याच परिचयाचा आणि जिव्हाळ्याचा असल्याचे दिसून येते. कादंबरी वाचली नाही असा व्यक्ती समाजामध्ये विरळाच. 'कादंबरी' हा विस्तृत अशाप्रकारचा वाङ्मय प्रकार आहे. तो आकाराने मोठा असल्याने मानवी जीवन सर्वांगपरिपूर्णरित्या स्वत:मध्ये सामावून घेतो. परिणामी समाजामध्ये सर्वात जास्त लोकांकडून हा वाङ्मयप्रकार वाचला जात असताना दिसून येतो. म्हणूनच माणूस त्याचे जीवन आणि जगणे, त्याचे जग आणि सभोवतालचे पर्यावरण साहित्याचे प्रधान विषय ठरतात. लेखकाचे सभोवतालच्या सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाशी जैविक नाते असते. त्यामुळे पर्यावरणातील परिवर्तनाचे पडसाद त्यांच्या आविष्कृतीमधून उमटत असतात. साहित्य व्यवहारामध्ये प्रामुख्याने अनेक संकल्पना रूढ झालेल्या आहेत. जसे की देशीयवादी, अस्तित्ववादी, वास्तववादी, जनवादी, मार्क्सवादी इ संकल्पना महत्त्वाच्या मानलेल्या आहेत. एखादी संकल्पना सहजासहजी निर्माण होत नाही. त्यापाठीमागे काही महत्त्वाच्या घटना, विचार, संकल्पना मुळातच महत्त्वाच्या मानलेल्या आहेत.

अठराव्या शतकातल्या साहित्याला समकालीन, प्राचीन साहित्य असे संबोधले जाते. साधारणत: १९४५ च्या आसपास जी साहित्यनिर्मिती झाली, त्या साहित्य निर्मितीतून काही संकल्पना व वाङ्मयीन प्रवाह वाङ्मयाच्या प्रांतात रूढ झाले. त्यापैकी समकालीन साहित्य, नवसाहित्य, स्वातंत्र्योत्तर साहित्य, साठोत्तर साहित्य, जनवादी साहित्य, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदी संकल्पना आणि वाङ्मयीन प्रवाहांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. १९६० नंतरच्या कालखंडामध्ये असंख्य लेखक कादंबरीलेखन करू लागले होते. मराठी कादंबरीच्या क्षेत्रात विविध प्रवाह निर्माण झाले. यामध्ये १९६० पूर्वीच्या मराठी कादंबरीच्या क्षेत्रात खूप मोठ्या प्रमाणात भर पडली. सामाजिक, राजकीय, ग्रामीण, प्रादेशिक, ऐतिहासिक, पौराणिक, चरित्रात्मक, वास्तववादी, अस्तित्ववादी, अशाप्रकारे अनेक नावांनी मराठी कादंबऱ्यांचे प्रवाह ओळखले गेले. एकूणच १९४५ पासून मराठी साहित्यक्षेत्रामध्ये निर्माण झालेल्या 'समकालीन' या प्रवाहाने १९८५ पर्यंत असंख्य कलाकृतींची निर्मिती करून आपले स्वरूप चिरतरूण केल्याचे प्रत्यंतर येते.

'युगांतर', 'बाबासाहेब आणि युगमुद्रा' या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून यशवंत मनोहर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने अस्पृश्य समाजाला मिळालेल्या नेत्याचे प्रेरणादायी गीतगाण्याचा प्रयत्न केला आहे. मी, आम्ही, बंधो, मित्रा या संबोधनातून कवी, विश्वात पिचल्या - पिळल्या जाणाऱ्या माणसाच्या स्वातंत्र्य - समतेचा एल्गार पुकारतो. बाबासाहेबांनी सर्वहारांना प्रज्ञेचा प्रकाश पुरवल्याबद्दल धन्यवाद देतो. सर्वहारांचे सामूहिक प्रतिनिधित्व करतो. सर्वहारांमध्ये चेतना आणि चैतन्य निर्माण करतो. शोषणाविरुद्ध सत्य आणि अहिंसात्मक समतासंगरात सहभागी होण्याचे आवाहन करतो. सर्वहारांच्या नवनव्या समस्यांचे - प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी बाबासाहेब विश्लेषणाची प्रज्ञा बनतात. क्रांतिची केमिस्ट्री शिकवतात, यासंदर्भात कवी



Scanned with OKEN Scanner

म्हणतात,

"तुम्ही फाडलीत फॅसिस्टांची खोटी परमसत्ये
तुम्ही आग लावलीत स्वर्ग -
नरकाच्या बुजगावण्याला
अंधश्रद्धांचे गड उद्ध्वस्त केलेत तुम्ही सुरुंग लावून
भीतीच्या मळ्यावरून धावला तुमचा प्रपाती प्रभंजन
माणसांच्या अजिंक्य प्रतिभेचा तुम्ही जगातला सर्वात उंच मनोरा...
बाबासाहेब...! सत्याचा पराभव होईल खूपदा
पण अंतिम विजय असत्याच्या वाट्याला कधीच येत नाही
अंतिम विजयाचे धनी असते फक्त सत्य
दुष्टपणा जिंकेल खूपदा, पण अंतिम विजय सज्जनत्वाचाच होतो
चांगुलपणा खूपदा दुबळा ठरतो,
पण त्यामुळे वाईटपणा चांगला ठरत नाही कधीही..."[५]

प्रस्तुत काव्यपंक्तिंच्या माध्यमातून कवी मनोहर म्हणतात की, आजच्या युगात माणसाचे वस्तुकरण झाले आहे. परंतु सर्वहारांना तर इतिहासभर वस्तूही मानले गेले नाही. ते कायम कवडीमोल आणि वस्तुविहीनच राहिले. केवळ पिचले-पिळले गेले. जगाच्या शोषणचरकात शोषकांच्या सुखासाठीच इतिहासभर राबले. थोडक्यात कवीच्या मते, शोषक मरतात; परंतु सर्वहारांना मृत्यूच नसतो. सर्वहारा जगात जन्मालाच येतात, त्यांची जननदी उलट्या दिशेने वाहू लागली, की शोषकांच्या युगाचा तो शोकान्त असतो. पण सर्वांनाच जगा, जगवा आणि जगू द्या! हेच बाबासाहेबांचे तत्त्व त्यांच्या जगण्याचे अंतिम फलित असते. म्हणूनच, बाबासाहेब...! म्हणजेच क्रांतिकारी पुनर्रचना, असा अर्थ कवी या माध्यमातून संपूर्ण जगाला सांगतो आहे.

मर्ढेकरांच्या नवकवितेचा आणि पु. शि. रेग्यांच्या तरल रोमँटिक कवितेचा वारसा लघुपत्रिकेतील कवींनी समकालीन जीवनजाणिवांच्या संदर्भात, कालसापेक्ष परिघात, अभिव्यक्ती व शैलींचे प्रयोग करीत लघुपत्रिकेतील कवितांचा एक स्वतंत्र प्रवाह साधारणतः साठोत्तरी कालखंडात मराठी कवितेत रूढ केला. अरुण कोल्हटकर, दिलीप चित्रे, नामदेव ढसाळ, भालचंद्र नेमाडे, वसंत आबाजी डहाके, सतीश काळसेकर, मनोहर ओक, चंद्रकांत पाटील, तुलसी परब, वसंत दत्तात्रेय गुर्जर, अशोक शहाणे ह्या कवींनी लघुपत्रिकेतील कवितेला स्वतंत्र चेहरा दिला. इंद्रियोपनिषद, साक्षात्, विलंबित, आणि आता पुन्हा एक कवितासंग्रह एकविसाव्या शतकातील ग्लोबल युगाची काव्यात्म मांडामांड करणारा प्रकाशनाच्या वाटेवर आहे. वयाच्या पंचाहत्तरीतही काळसेकर लिहिते लेखक - कवी आहेत. कदाचित गेल्या पंधरावीस वर्षातील काही प्रकाशित तर काही अप्रकाशित कवितालेखनाचा हा शेवटचा टप्पा असावा. खरंतर लघुपत्रिकेतील एका संवेदनशील कविमाणसाने अनुभवसृष्टीला सृजनाचं रूप देताना, पंच्याहत्तरीतल्या सबंध जीवनावकाशाची झाडलोट करून अर्थपूर्ण सुखदुःखांच्या तरीही आनंदमय व सौंदर्यशील आर्त जीवनातील केलेली मांडामांड आहे. कवी काळसेकरांच्या ह्या कालखंडातील विलंबितनंतरच्या कविताही त्यांच्या आयुष्यातील उत्तरार्धाचेच काव्य - कीर्तन असल्याची साक्ष देतात. उदा. मांडामांड, झाडलोट, काळजाचे काप, तसं तर, तुझी आठवण येते, भयावह, निरंतर, सांगायचं, प्रार्थना, खंत, आपली पिलं, कवितांतून, बाळांनो, वयाला साजेसे, पुलाखालून गंगा वाहतेय, इतके मात्र खरे, वर्तमान, कवितेसोबत, तिच्यासाठी कविता, दुसरा, तिसरा, काहीच टाकता येईना, एक दीर्घ कविता, अचंबित अशाप्रकारच्या एकूण ३४ कवितांची मांडणी करून चौथ्या कवितेची निर्मितीदेखील त्यांनी केली आहे. कवी केवळ सुंदर जगाला अधिक सुंदर आणि चराचरांतील जिवांना

मुक्तपणे, निर्भयपणे, आनंदानं जगता यावं यासाठी प्रतिभावंत केवळ सुंदर असलेल्या जगाची पुनर्मांडणी करतात. कवीची कविताही जगाला अधिक सुखमय आणि सुंदरमय करण्यासाठी केलेली पुनर्मांडणी आहे. तसं तर कमी कष्टाचं नसलेलंच हे संगळं या कवितेतून आजच्या जगाविषयी - युगांतराविषयी - वर्तमानाविषयी बोलताना, कवी पुढील भूमिका मांडतात,

"समजून उमजून तुम्ही जेव्हा पावलं टाकाल
सर्वनाशाच्या दिशेनं जाण्याची
शक्यता असलेल्या वाटांवर आयुष्याला भिडत
जळतजाळत
तेव्हा तेव्हा भेटत राहतील कविता
या किंवा याहून निराळ्या रूपात..."

उपरोक्त कवितेच्या माध्यमातून कवीला वर्तमानात, जागतिकीकरणात जगणाऱ्या विनाशी जगाविषयी साक्षात्कार होतो. कवीला माणसांत जनावरं आणि जनावरांत माणूस दिसू लागतो. निसर्गात घुसळून घ्यावसं वाटतं तर निसर्गच माणसांना गिळत चालल्याचं वास्तव समोर येतं. आजच्या धर्मांध हिंस्त्र जगात दंगली - दहशतीत - बॉम्बस्फोटात कानाचे पडदे आतवर फाडणारे रात्रंदिन भोवतालात गुंजणारे ऐकण्यापेक्षा पूर्वीचे क्षय, विषमज्वर, पटकी, प्लेगची साथ बरी म्हणायची वेळ माणसावर आल्याचे वास्तव याठिकाणी प्रतिबिंबित होते.

जगाला सुंदर - सुखी जीवन देण्याच्या गतीत, आपल्याच जीवनाची गती हरविलेल्या सर्वसामान्य, सर्वहारा, दलित - पीडित - कष्टकरी -शोषित- कामगार लोकांच्या जीवनातील सुख, दुःख उजागर करण्याच्या हेतूने काव्यलेखन करणारे लोकनाथ यशवंत हे अत्यंत महत्त्वपूर्ण कवी आहेत. एका वृक्षाची गोष्ट, आजच्या बोन्साय माणुसकीच्या खुरट्या संस्कृतीवर तीव्र औपरोधिक भाष्य करते. कुपोषणाने गोजिरी मुलं मरत आहेत. अकाली आणि एनजीओवाले आनंदात आहेत. सरकारला असल्या बाबींकडे लक्ष द्यायला वेळ नाही. शहरी डॉक्टर जेव्हा आदिवासींनी मुख्य धारेत यावे म्हणतो, तेव्हा कवी त्याला म्हणतो,

"मी लगेचच म्हणालो
तुमच्या वातानुकूलित घरी आणून ठेवतो कुपोषितांना
डॉक्टरसाहेब समोरून गेले तरी,
बघत नाहीत माझ्याकडे आजकाल..."

थोडक्यात बोलायचे झाले तर वर्तमान व्यवस्थेत सुखावलेल्यांना दुखावलेल्यांची केवळ बोलण्यापुरती चिंता आहे. साक्षात काही करायची वेळ आली की हे लोक चामडीबचाव धोरणाचा अवलंब करतात. कितीही राग व्यक्त केला तरी गेंड्याची कातडी असते, ती मऊ होतच नाही. अशाप्रकारचे वास्तव चित्रण कवींनी आपल्या एकूणच कवितांमधून प्रतिबिंबित केल्याचे प्रत्यंतर येते.

कवी अजय कांडर हे अलिकडच्या कालखंडातील आणखी एक महत्त्वाचे कवी. त्यांची कविता ग्लोबल होत जाणाऱ्या खेड्यातील भेदक वास्तव समाजासमोर ठेवते. कलावंत कलेच्या माध्यमातून विकसित होत असतो. तेव्हा त्याची मुळं महत्त्वाची आहेत. ज्या जमिनीत आपण पीक घेत असतो त्या जमिनीची अधिकाधिक मशागत होते तेव्हाच चांगलं पीक येतं. कवीला वाटतं, विचारवंतांनी आणि कलावंतांनी सत्यच व्यक्त करावं. पण तसं घडत नाही. तेरीभी चूप और मेरीभी चूप, अशा परिस्थितीत माणसाला कुठल्याच अर्थानं व्यक्त होता येत नाही. माणसाचा अख्खा मेंदूच सनातन कोळिष्टक बनून जातो. निरंकुश सत्ता देशा - देशात आकाराला येते, तेथे अभिव्यक्ति स्वातंत्र्याचा गळाच आवळला जातो. कवीला वाटतं,

"लिहिणाऱ्या शब्दातून
सत्यच लिहिलं गेलं पाहिजे
शब्दाचा अन्वयार्थ शोधतानाही

कुठल्याही चाचापंडिताला
सापडू नये अपशब्दाचा धागा
तसाहि धोका
न पत्करण्याइतपत राहू लागले दक्ष...''[१४]

थोडक्यात लोकांना स्वप्न दाखवून, जात - धर्म - देवादींच्या संभ्रमात गुंतवून ठेवणं सहजसाध्य असतं. लोकमानसावर अनभिषिक्त साम्राज्य मिळविल्याच्या उन्मादातच सत्ताधाऱ्याला वाटतं, आई - बापापेक्षा ईश्वर श्रेष्ठ, आणि यांना मनोमन पटवून गेलंय. हेच राजकीय सत्तेचं वास्तव समकालात सबंध देशात आकाराला आल्याचे दिसते.

यानंतरच्या कालखंडामध्ये कवी मोहन कुंभार, कवी अशोक कोतवाल, पी. विठ्ठल, कवी सुनील अवचार, कवी फेलिक्स डिसोजा, कवी सुखदेव ढाणके, कवी श्रीकांत देशमुख, कवी श्रीकृष्ण राऊत, अनिल धाकू कांबळी, कवी संतोष पद्माकर पवार, कवी राजीव जोशी, कवी सुरेश सावंत, कवी वीरधवल परब, कवयित्री कल्पना दुधाळ, कवयित्री रेखा, कवयित्री शोभा रोकडे, कवयित्री अनुजा जोशी, कवयित्री सुचिता खल्लाळ यासारख्या कवी आणि कवयित्रींनी बदलते समाजवास्तव आपल्या काव्याच्या माध्यमातून चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. वर्तमान कालखंडामध्ये कवी भगवान निळे, दिगंबर झाडे, सिद्धार्थ भगत, कवी शशिकान्त लोखंडे, कवी प्रमोदकुमार अणेराव, कवी वाहरू सोनवणे यासारख्या कवींच्या रूपाने साठोत्तरी साहित्यामध्ये एक परिवर्तनवादी प्रवाह उदयास आला. यामध्ये आदिवासी साहित्य हाही एक मूलनिवासीच्या जीवनजाणिवांना अभिव्यक्त करून त्यांना जगण्याचा मूलभूत हक्क मिळावा; या हेतूने अस्तित्वात आला. थोडक्यात आदिवासी साहित्यिकांनी साठोत्तरी कालखंडात उलगुलान लढा उभारून, आदिवासीजीवन जाणिवांची अनुभवनिष्ठ निर्मिती करणारे साहित्य निर्माण केले. आदिवासी साहित्याची मुहूर्तमेढ साहित्याच्या प्रांतात रोवली गेली. वाहरू सोनवणेंची कविता ही एका निष्ठावंत कार्यकर्त्याच्या निष्ठापूर्वक चालविलेल्या उलगुलान लढ्याची अनुभवाधिष्ठित कविता आहे. आदिवासी समाजाकडे नागरी समाजव्यवस्था तुच्छतेने पाहते. वाहरूंची कविता गोधडमध्ये विद्रोही सलामी देताना नागरीव्यवस्थेलाही वठणीवर आणताना उपहासाने पुढील प्रतिक्रिया नोंदविते.

''आम्ही स्टेजवर कधी गेलोच नाही
आणि आम्हाला बोलावलंही नाही
बोटाच्या इशाऱ्यांनी -
आमची पायरी आम्हालाच दाखवून दिली
आम्ही तिथेच बसलो;
आम्हाला शाब्बासकी मिळाली.
आणि ते स्टेजवर उभे राहून -
आमचे दु:ख आम्हालाच सांगत राहिले...''[१५]

उपरोक्त काव्यपंक्तिंच्या माध्यमातून कवी आदिवासी समाजाचे कालही दु:ख होते आणि आजही त्यात हवातितका बदल झालेला नाही. आदिवासी समाजजीवन जाणिवेला सत्य आणि वास्तवाचा स्पर्श जर कुणी दिला असेल तर तो आदिवासीपाड्यांतून जन्मणाऱ्या - भोगणाऱ्या आदिवासी लेखक - कवींनीच. कवी अत्यंत साध्या, सोप्या, सुगम पद्धतीने आपल्या विचार आणि चिंतनशीलतेची अभिव्यक्ती कवितेच्या माध्यमातून करतो. भाषिक चमत्कार आणि प्रतिमा-प्रतीकांची कसरत कोणत्याही कवितेतून कवीला करण्याची गरज वाटली नाही. निसर्ग आणि आदिवासी जितक्या सहजपणे अभिव्यक्त होतात, चराचरांशी आपली नाळ जोडतात, तशीच वाहरूंची कविता आपल्या स्वाभाविक आणि नैसर्गिक अभिव्यक्तीनेच समाजमनाचा तळ ढवळून, माणसाला माणूस समजून माणसासारखं जगण्याचा संदेश देताना दिसते. वाहरूंची अभिव्यक्ती आणि शैली अनुभवनिष्ठ आणि आत्मनिष्ठ असून, तिला कोणतेच अलंकार परिधान

करून सौंदर्य फुलविण्याची गरज नाही.आदिवासींच्या जीवनजाणिवा अभिव्यक्त करीत असताना वाहरूंची कविता दऱ्याखोऱ्यातील चराचरांचे जीवन अर्थपूर्ण करीत जाताना दिसते.

**समारोप :**

मानव हा समाजशील प्राणी आहे. समाजाशिवाय तो जिवंत राहू शकत नाही. वास्तविक पाहता साहित्य हे मानवाच्या समाजव्यवहाराचे एक अंग आहे. त्यामुळे स्वाभाविकपणेच मानव हा साहित्याच्या केंद्रस्थानी असणे अपरिहार्य आहे. म्हणूनच माणूस त्याचे जीवन आणि जगणे, त्यांचे जग आणि सभोवतालचे पर्यावरण साहित्याचे प्रधान विषय ठरतात. साहित्य व्यवहारामध्ये प्रामुख्याने अनेक संकल्पना रूढ झालेल्या आहेत. जसे की देशीयवादी, अस्तित्ववादी, वास्तववादी, जनवादी, मार्क्सवादी इ. संकल्पना महत्त्वाच्या मानलेल्या आहेत. १९४५ च्या आसपास जी साहित्यनिर्मिती झाली, त्या साहित्यनिर्मितीतून काही संकल्पना व वाङ्मयीन प्रवाह वाङ्मयाच्या प्रांतात रूढ झाले. त्यापैकी समकालीन साहित्य, नवसाहित्य, स्वातंत्र्योत्तर साहित्य, साठोत्तर साहित्य, जनवादी साहित्य, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदी संकल्पना आणि वाङ्मयीन प्रवाहांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. त्यातील समकालीन या संकल्पनेचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. मराठीतील १९४५ ते १९६० आणि १९६० आणि १९८५ ह्या कालखंडातील साहित्याला समकालीन साहित्य असे संबोधले जाते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये विशेषत: २०१० नंतर लिहिल्या गेलेल्या समकालीन कवितांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. आधुनिक आणि समकालीन यातला मुख्य भेद म्हणजे आधुनिक साहित्य हे समकालीन साहित्य असू शकते, परंतु समकालीन साहित्य हे आधुनिक साहित्य असेलच असे नाही.

समकालीनतेमध्ये त्या विशिष्ट काळातील समस्या, प्रश्न, ताण, अंतर्विरोध यांचा समावेश होतो. म्हणजे समकालीनतेमध्ये तात्कालीनतेचा संदर्भ असतो. मनुष्याला तात्कालिक संदर्भ महत्त्वाचे वाटतात. तसेच काही तात्कालीनतेच्या सीमेबाहेरचे व्यापक संदर्भ महत्त्वाचे वाटतात. अरुण कोल्हटकर, दिलीप चित्रे, नामदेव ढसाळ, भालचंद्र नेमाडे, वसंत आबाजी डहाके, सतीश काळसेकर, मनोहर ओक, चंद्रकांत पाटील, तुलसी परब, वसंत दत्तात्रेय गुर्जर, अशोक शहाणे ह्या कवींनी लघुपत्रिकेतील कवितेला स्वतंत्र चेहरा दिला. यानंतरच्या कालखंडामध्ये कवी मोहन कुंभार, कवी अशोक कोतवाल, पी. विठ्ठल, कवी सुनील अवचार, कवी फेलिक्स डिसोजा, कवी सुखदेव ढाणके, कवी श्रीकांत देशमुख, कवी श्रीकृष्ण राऊत, अनिल धाकू कांबळी, कवी संतोष पद्माकर पवार, कवी राजीव जोशी, कवी सुरेश सावंत, कवी वीरधवल परब, कवयित्री कल्पना दुधाळ, कवयित्री रेखा, कवयित्री शोभा रोकडे, कवयित्री अनुजा जोशी, कवयित्री सुचिता खल्लाळ यासारख्या कवी आणि कवयित्रींनी समकालीन समाजवास्तव आपल्या काव्याच्या माध्यमातून चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. वर्तमान कालखंडामध्ये कवी भगवान निळे, दिगंबर झाडे, सिद्धार्थ भगत, कवी शशिकान्त लोखंडे, कवी प्रमोदकुमार अणेराव, कवी वाहरू सोनवणे यासारख्या कवींच्या रूपाने साठोत्तरी साहित्यामध्ये एक परिवर्तनवादी प्रवाह उदयास आला. यामध्ये आदिवासी साहित्य हाही एक मूलनिवासींच्या जीवनजाणिवांना अभिव्यक्त करून त्यांना जगण्याचा मूलभूत हक्क मिळावा; या हेतूने अस्तित्वात आला.

**संदर्भ :**


१. कुलकर्णी मदन, : 'समकालीन साहित्य', मराठी साहित्यातील नवीन प्रवाह, संपा. शरणकुमार लिंबाळे, मधुराज पब्लिकेशन्स् प्रा. लि. पुणे, प्रथमावृत्ती, १९९३, पृ - ३३.

२. कुलकर्णी मदन, : 'साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह (संपा.डॉ. शरणकुमार लिंबाळे),




Scanned with OKEN Scanner